# जगाच्या कल्याणासाठी मनुष्याने शाश्वत जीवनशैली पुढे घेवून जाणे आवश्यक : सिध्दार्थ शिंदे

कोल्हापूर : जगाच्या कल्याणासाठी मनुष्याने शाश्वत जीवनशैली पुढे घेवून जाणे आवश्यक आहे. आर्थिक चक्रास चालना देण्याच्या प्रयत्नांत आपले शाश्वत विकासाकडे दुर्लक्ष होऊ नये, असे प्रतिपादन व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे यांनी शुक्रवारी येथे केले.




शिवाजी विद्यापीठाचे सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र आणि इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या गणित अधिविभागातील सभागृहामध्ये 'ई-कचरा व्यवस्थापन आणि शाश्वतता' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी उपस्थित होते.

सिध्दार्थ शिंदे पुढे बोलताना म्हणाले, संगणक, लॅपटॉप, टॅब, मोबाईल फोन, चार्जर यामधील बॅटरी यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे हे जगासमोर मोठे आवाहन ठरत आहे. त्याचबरोबर, काळानुरूप मोठ्याप्रमाणात वापरात येत असलेल्या इलेक्ट्रीक वाहनांच्या बॅटरीचे योग्य पध्दतीने विल्हेवाट करण्यासाठी आवश्यक ते संशोधन करण्याची मोठी संधी विद्यापीठास प्राप्त झालेली आहे. या संशोधनामधून नवीन उद्योगाची निर्मिती होवू शकते. वापरा आणि फेका वस्तूंबरोबरच कमी किंमतीत मिळणारे साधने पुढे आपणांस खूप घातक ठरू शकतात. यामध्ये असलेले रसायने भूजल पातळीमध्ये मिसळल्याने अनेक आरोग्याच्या समस्या निर्माण होतील. आपणच आपल्या विनाशाचे कारण बनत आहोत.

ई-कचरा निर्माण होवू नये यासाठी समाजामध्ये मोठ्याप्रमाणात जागृकता निर्माण झाली पाहिजे. आपणाकडून होत असलेल्या प्लास्टिकचा वापर आणि ई-कचरा निर्मिती याकडे संवेदनशीलपणे पाहणे आवश्यक आहे. प्लास्टिकचे सूक्ष्मकण मानवाच्या शरीरामध्ये आढळून येत आहेत, हे खूप गंभीर आहे. कमी कमी गॅजेट्सचा वापर आणि पूर्नवापर करण्याकडे विद्यार्थ्यांनी कटाक्षाने पाहिले पाहिजे. भविष्यात मोठ्या प्रमाणात आवश्यक असलेले हायड्रोजन इंधन प्रकल्प पुढे कसे घेवून जाता येईल हे विद्यापीठाने पहावे. त्याची निर्मिती आणि साठा याकडेही विशेष लक्ष केंद्रीत करून आवश्यक ते संशोधन करावे. नवीन सक्षम पिढी निर्माण करण्यासाठी विद्यापीठातील संशोधक आणि प्राध्यापकांनी मोठे योगदान देणे आवश्यक आहे.

अध्यक्षीय मनोगतामध्ये बोलताना कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले की, एका महत्वपूर्ण अहवालानुसार ६६ दशलक्ष टन गोळा झालेल्या ई-कचऱ्यामध्ये पाच दशलक्ष टन कचरा हा केवळ मोबाईलचा होता. यापैकी फक्त २२.३ टक्के ई-कचरा हा पुर्नप्रक्रीयेमध्ये जातो. इलेक्ट्रॉनिक गॅझेटमध्ये वापरात येत असलेल्या २२ मूलद्रव्यांपैकी अत्यंत दुर्मिळ मूल्यद्रव्य म्हणजे लिथीयम. आपल्याच देशाकडे मूबलक प्रमाणात लिथीयमचा साठा असावा याकरिता सगळेच राष्ट्र प्रयत्नशील आहेत. भविष्यात यामुळे जगाचा भूगोलही कदाचित बदलू शकतो. आरोग्यास हानिकार असलेल्या ई-कचऱ्यामधील मूल्यद्रव्ये पाण्यात मिसळल्याने त्याचा मानवी शरीरावर मोठ्याप्रमाणात आघात परिणाम होवू शकतो. शंभर वर्षे होत आले तरी आपण याकडे गांभीर्याने पहात नाही.

ते पुढे म्हणाले की, २०१० साली ई-कचरा ३४ दशलक्ष टन होता. २०३० साली ८० दशलक्ष टन इतका ई-कचरा तयार होण्याची शक्यता संशोधकांनी बोलावून दाखविली आहे. जुन्या गॅझेटस्कडून नवीनकडे जाताना आपण जाणीवपूर्वक विचार केला पाहिजे. एखादे उपकरण तयार करण्यासाठी विविध खनीज इंधनाबरोबरच २२ किलो वेगवेगळ्या प्रकारचे रसायने आणि दिडटन पाण्याचा वापर एक संगणक तयार करण्यासाठी होत असतो. किती संसाधनांचा यामध्ये वापर होतो, याचा प्रामुख्याने विचार केला पाहिजे. समाजामध्ये याबाबत जागृती निर्माण झाली पाहिजे. चांगले अन्न, शुध्द पाणी आणि शुध्द हवा मिळण्याची शाश्वतता राखावयाची असेल तर ई-कचरा वातावरणात मिसळू नये, याची जाणीव प्रत्येकांमध्ये येणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक सामाजिक समावेश अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी केले. डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानेल. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे डॉ. पी. ए. कदम, तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. अजित कोळेकर, आनंद खामकर, दिनेश उथळे, शरद पाटील, उदय पोवार, विनोद लोखंडे यांचेसह शिक्षक, संशोधक विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.


**जाहीर नोटीस**

सर्व संबंधितांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे पक्षकार **१) श्री. शंकर महादेव परब आणि २) सौ. माळी शंकर परब,** रा.- फ्लॅट क्र. ४०२, ४था मजला, श्री वृंदा सी.एच.एस.एल., फडके रोड, ब्राह्मण सोसायटी, गोडबोले हॉस्पिटलच्या मागे, नौपाडा, ठाणे यांनी खालील परिशिष्टात नमूद केलेली सदनिका मालकी हक्काने **श्री. दिनेश अमोद केळकर** यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदर सदनिका मालकी हक्काने विकत घेण्यास इतर कोण्या व्यक्ती व्यक्तींचा, वारसांचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लिज, पोटगी, साठेकरार, खरेदीखत, मेंटेनन्स, वगैरे अनुषंगाने कसलाही हितसंबंध असल्यास अथवा सदर सदनिकेचे खरेदी-विक्री व्यवहारास काही हरकत असल्यास तशी लेखी हरकत कागदोपत्री पुराव्यासह खाली

पुण्यनगरी
30 MAY 2026
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाश्वत जीवनशैलीची आवश्यकता : शिंदे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जगाच्या कल्याणासाठी मनुष्याने शाश्वत जीवनशैली पुढे घेऊन जाणे आवश्यक आहे. आर्थिक चक्रास चालना देण्याच्या प्रयत्नात आपले शाश्वत विकासाकडे दुर्लक्ष होऊ नये, असे प्रतिपादन व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी शुक्रवारी केले.

शिवाजी विद्यापीठाचे सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र आणि इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या गणित अधिविभागातील सभागृहामध्ये 'ई-कचरा व्यवस्थापन आणि शाश्वतता' या विषयावर विशेष व्याख्यानात ते बोलत होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते.

शिंदे म्हणाले संगणक, लॅपटॉप, टॅब, मोबाईल फोन, चार्जर यामधील बॅटरी यांची योग्यप्रकारे विल्हेवाट लावणे हे जगासमोर मोठे आवाहन ठरत आहे. काळानुरूप मोठ्या प्रमाणात वापरात येत असलेल्या इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटऱ्यांची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक ते संशोधन करण्याची मोठी संधी विद्यापीठास प्राप्त झालेली आहे. या संशोधनामधून नवीन उद्योगाची निर्मिती होऊ शकते, असेही ते म्हणाले. अध्यक्षीय मनोगतामध्ये कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, एका महत्त्वपूर्ण अहवालानुसार ६६ दशलक्ष टन गोळा झालेल्या ई-कचऱ्यामध्ये पाच दशलक्ष टन कचरा हा केवळ मोबाईलचा होता. यापैकी फक्त २२.३ टक्के ई-कचरा हा पुनर्प्रक्रियेमध्ये जातो.

स्वागत सामाजिक समावेश अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी केले. डॉ. किशोर खिल्लारे यांनी आभार मानले. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे डॉ. पी. ए. कदम, तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. अजित कोळेकर, आनंद खामकर, दिनेश उथळे, शरद पाटील, उदय पोवार, विनोद लोखंडे आदी उपस्थित होते.

30 MAY 2025 जनप्रवास जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गॅझेटसचा वापर कमी अन् पुनर्वापराकडे लक्ष द्यावे

## सिध्दार्थ शिंदे यांचे विद्यार्थ्यांना आवाहन : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**जनप्रवास : कोल्हापूर**

ई-कचरा निर्माण होऊ नये, यासाठी समाजामध्ये मोठयाप्रमाणात जनजागृती निर्माण झाली पाहिजे. आपणाकडून होत असलेल्या प्लास्टिकचा वापर आणि ई-कचरा निर्मिती याकडे संवेदनशीलपणे पाहणे आवश्यक आहे. प्लास्टिकचे सूक्ष्मकण मानवाच्या शरीरामध्ये आढळून येत आहेत, हे खूप गंभीर आहे. कमीत कमी गॅझेटचा वापर आणि पूनर्वापर करण्याकडे विद्यार्थ्यांनी कटाक्षाने पाहिले पाहिजे, असे मत व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचे सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र आणि इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या गणित अधिविभागातील सभागृहामध्ये 'ई-कचरा व्यवस्थापन आणि शाश्वतता' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित होते.

सिध्दार्थ शिंदे म्हणाले, इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटरीचे योग्य पध्दतीने



विल्हेवाट करण्यासाठी आवश्यकते संशोधन करण्याची मोठी संधी विद्यापीठास प्राप्त झालेली आहे. या संशोधनामधून नवीन उद्योगाची निर्मिती होऊ शकते.

भविष्यात मोठयाप्रमाणात आवश्यक असलेले हायड्रोजन इंधन प्रकल्प पुढे कसे घेऊन जाता येईल हे विद्यापीठाने पहावे. त्याची निर्मिती आणि साठा याकडेही विशेष लक्ष केंद्रित करून आवश्यक ते संशोधन करावे. नवीन सक्षम पिढी निर्माण करण्यासाठी विद्यापीठातील संशोधक आणि प्राध्यापकांनी मोठे योगदान देणे आवश्यक आहे.

अध्यक्षीय मनोगतामध्ये डॉ.विलास शिंदे म्हणाले - एखादे उपकरण तयार करण्यासाठी विविध खनीज इंधनाबरोबरच २२ किलो वेगवेगळया प्रकारचे रसायने आणि दिडटन पाण्याचा वापर एक संगणक तयार करण्यासाठी होत असतो. किती संसाधनांचा यामध्ये वापर होतो, याचा प्रामुख्याने विचार केला पाहिजे. चांगले अन्न, शुध्द पाणी आणि शुध्द हवा मिळण्याची शाश्वतता राखावयाची असेल तर ई-कचरा वातावरणात मिसळू नये, याची जाणीव प्रत्येकांमध्ये येणे आवश्यक आहे. स्वागत व प्रास्ताविक सामाजिक समावेश अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी केले. डॉ. किशोर खिल्लारे यांनी आभार मानेल.

डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास इलेक्ट्रॉनिक्स् अधिविभागाचे डॉ. पी. ए. कदम, तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. अजित कोळेकर, आनंद खामकर, दिनेश उथळे, शरद पाटील, उदय पोवार, विनोद लोखंडे, शिक्षक, संशोधक विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

### शाश्वत जीवनशैली हवी

जगाच्या कल्याणासाठी मनुष्याने शाश्वत जीवनशैली पुढे घेऊन जाणे आवश्यक आहे. आर्थिक चक्रास चालना देण्याच्या प्रयत्नात आपले शाश्वत विकासाकडे दूर्लक्ष होऊ नये, असेही शिंदे यांनी स्पष्ट केले.

30 MAY 2026
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाज कल्याणासाठी शाश्वत जीवनशैली आवश्यक

- सिद्धार्थ शिंदे यांचे प्रतिपादन
- शिवाजी विद्यापीठात व्याख्यानाचे आयोजन

प्रतिनिधी, कोल्हापूर




**कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे. सोबत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.**

जगाच्या कल्याणासाठी मनुष्याने शाश्वत जीवनशैली पुढे घेवून जाणे आवश्यक आहे. आर्थिक चक्रास चालना देण्याच्या प्रयत्नांत आपले शाश्वत विकासाकडे दुर्लक्ष होऊ नये, असे प्रतिपादन व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र आणि इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. त्यांनी 'ई-कचरा व्यवस्थापन आणि शाश्वतता" या विषयावर मार्गदर्शन केले. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी उपस्थित होते.

शिंदे म्हणाले, संगणक, लॅपटॉप, टॅब, मोबाईल फोन, चार्जर यामधील बॅटरी यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे हे जगासमोर मोठे आवाहन ठरत आहे. त्याचबरोबर, काळानुरूप मोठ्याप्रमाणात वापरात येत असलेल्या इलेक्ट्रीक वाहनांच्या बॅटरीचे योग्य पध्दतीने विल्हेवाट करण्यासाठी आवश्यक ते संशोधन करण्याची मोठी संधी विद्यापीठास प्राप्त झालेली आहे. या संशोधनामधून नवीन उद्योगाची निर्मिती होवू शकते. वापरा आणि फेका वस्तूंबरोबरच कमी किंमतीत मिळणारे साधने पुढे आपणांस खूप घातक ठरू शकतात. यामध्ये असलेले रसायने भूजल पातळीमध्ये मिसळल्याने अनेक आरोग्याच्या समस्या निर्माण होतील. आपणच आपल्या विनाशाचे कारण बनत आहोत. ई-कचरा निर्माण होवू नये यासाठी समाजामध्ये मोठ्याप्रमाणात जागरुकता निर्माण झाली पाहिजे, असे मत व्यक्त केले. भविष्यात मोठ्याप्रमाणात आवश्यक असलेले हायड्रोजन इंधन प्रकल्प पुढे कसे घेवून जाता येईल हे विद्यापीठाने पहावे. त्याची निर्मिती आणि साठा याकडेही विशेष लक्ष केंद्रीत करून आवश्यक ते संशोधन करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, एका महत्वपूर्ण अहवालानुसार ६६ दशलक्ष टन गोळा झालेल्या ई-कचऱ्यामध्ये पाच दशलक्ष टन कचरा हा केवळ मोबाईलचा होता. यापैकी फक्त २२.३ टक्के ई-कचरा हा पुर्नप्रक्रियेमध्ये जातो. इलेक्ट्रॉनिक गॅझेटमध्ये वापरात येत असलेल्या २२ मूलद्रव्यांपैकी अत्यंत दूर्मिळ मूल्यद्रव्य म्हणजे लिथीयम. आपल्याच देशाकडे मूबलक प्रमाणात लिथीयमचा साठा असावा याकरिता सगळेच राष्ट्र प्रयत्नशील आहेत. भविष्यात यामुळे जगाचा भूगोलही कदाचित बदलू शकतो.

सामाजिक समावेश अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. किशोर खिल्लारे यांनी आभार मानले. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. पी. ए. कदम, डॉ. अजित कोळेकर, आनंद खामकर, दिनेश उथळे, शरद पाटील, उदय पोवार, विनोद लोखंडे आदी उपस्थित होते.

# 'पुढारी एज्युदिशा २०२६' आजपासून

## शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



'दहावी आणि बारावीनंतर करिअरच्या वाटा शोधणाऱ्या विद्यार्थी आणि पालकांसाठी एकाच छताखाली सर्व प्रश्नांची उत्तरे घेऊन येणारे पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या करिअर आणि शिक्षणविषयक प्रदर्शनांपैकी एक असलेले दै. 'पुढारी' आयोजित 'एज्युदिशा २०२६' हे प्रदर्शन शनिवार (दि. ३०) पासून कोल्हापुरात सुरू होत आहे. विद्यार्थी आणि पालक आतुरतेने वाट पाहात असलेल्या या प्रदर्शनात अनेक नामवंत शैक्षणिक संस्थांचा सहभाग आहे.

प्रदर्शनाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत सकाळी साडेदहा वाजता व्ही. टी. पाटील स्मृती भवन राजारामपुरी येथे होणार आहे.

करिअरचे अगणित पर्याय, पारंपरिक कोर्सेसच्या पलीकडे जाऊन भविष्याचा वेध घेणाऱ्या करिअरच्या वैविध्यपूर्ण वाटा या प्रदर्शनात उपलब्ध असणार आहेत. यामध्ये इंजिनिअरिंग, मेडिकल, डिफेन्स, फार्मसी यांसोबतच आजच्या काळातील अत्यंत गतिमान अशा एआय (AI), डेटा सायन्स, रोबोटिक्स, अ‍ॅग्रो टेक, प्रॉम्प्ट इंजिनिअरिंग, मॅन्युफॅक्चरिंग, रिसर्च आणि डिझाईन यांसारख्या आधुनिक क्षेत्रांतील करिअरच्या सुवर्णसंधींची माहिती थेट तज्ज्ञांकडून दिली जाणार आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ८१४९५८२४४२, ९५४५३२७५४५.






### प्रदर्शनाचे स्थळ व वेळापत्रक

**कोल्हापूर :** ३०, ३१ मे आणि १ जून २०२६.
**स्थळ :** डॉ. व्ही. टी. पाटील स्मृती भवन , राजारामपुरी.

### तीन दिवस ज्ञानसत्रे; तज्ज्ञांचे मार्गदर्शन

• **शनिवार, दि. ३० मे** : दु. १२ ते १ : **वक्ते** - डॉ. मंजूश्री अभिषेक कदम (भारती विद्यापीठ डिम्ड युनिव्हर्सिटी) विषय - व्यवस्थापन अभ्यासामधील भविष्यातील संधी. सायं. ५ ते ६ : **वक्ते** - प्रा. राहुल माटे (प्रा. मीडिया आणि कम्युनिकेशन विभाग, विश्वकर्मा युनिव्हर्सिटी पुणे) एआयमध्ये (कृत्रिम बुद्धमत्ता) आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या युगात मीडिया करिअरचे भविष्य. • **रविवार, दि. ३१ मे** : स. ११ ते ११.३० : **वक्ते** - प्रा. डॉ. स्वप्नील हिरीकुडे (हेड ऑफ द डिपार्टमेंट, इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅन्ड कम्युनिकेशन इंजिनिअरिंग, संजय घोडावत युनिव्हर्सिटी कोल्हापूर. विषय - बारावीनंतर उच्च व तंत्र शिक्षणातील संधी, महत्त्व आणि आव्हान. स. ११.३० ते १२ : **वक्ते** - विद्यावाचस्पती विद्यानंद ऊर्फ प्रा. डॉ. शैलेश कुलकर्णी (सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस्). विषय - दहावी आणि बारावीनंतर करिअरचे पर्याय आणि संधी. सायं. ५ ते ६ : **वक्ते** - डॉ. सागर पाटील (सहायक प्राध्यापक स्कूल ऑफ बिझनेस एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ) विषय - कॉलेजपासून कॉर्पोरेटपर्यंत नव्या युगातील बीबीए मॉडेल. • **सोमवार, दि. १ जून** : स. १ ते १२ : **वक्ते** - डॉ. प्रफुल्ल हत्ते अधिष्ठाता ब्रँडिंग आणि कम्युनिकेशन विभाग एमआयटी अ‍ॅकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग आळंदी (इंजिनिअरिंगचे बदलते ट्रेंड आणि करिअरच्या सुवर्णसंधी)

### दिग्गज ब्रँडस्‌ची भागीदारी

या शैक्षणिक उपक्रमाचे मुख्य प्रायोजक 'संजय घोडावत युनिव्हर्सिटी, कोल्हापूर' हे आहेत; तर पावर्ड बाय प्रायोजक म्हणून 'विश्वकर्मा युनिव्हर्सिटी, पुणे' हे लाभले आहेत. सहयोगी प्रायोजक म्हणून 'एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटी' तर सहप्रायोजक म्हणून एमआयटी एडीटी युनिव्हर्सिटी पुणे, भारती विद्यापीठ डीम्ड युनिव्हर्सिटी, चाटे ग्रुप या प्रदर्शनात सहभागी झाले आहेत. पुणे, मुंबईसह देशभरातील नामांकित शिक्षण संस्था या प्रदर्शनात आपले स्टॉल लावणार आहेत.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**पात्रता :** इयत्ता दहावीसाठी ८५ टक्के आणि बारावीसाठी ७५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेले विद्यार्थी.
**कोणी पाठवावे? :** स्वतः विद्यार्थी, पालक किंवा संबंधित शाळा पाठवू शकतात.
**काय करावे? :** विद्यार्थ्यांचे पूर्ण नाव, शाळा/कॉलेजचे नाव आणि मार्कलिस्ट ८८०५००७७२४ या क्रमांकावर व्हॉटस्‌अप करावी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAY 2026
लोकमत

# शिक्षण धोरण समितीवर कामत

**कोल्हापूर** : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारकडून 'कार्यबल गट' स्थापन करण्यात आला असून या समितीवर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनिश कामत यांची सदस्य म्हणून नियुक्ती केली. सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये प्रभावी, सुसूत्र व एकसमान अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एक स्वतंत्र 'कार्यबल गट गठित केला आहे.

30 MAY 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय शिक्षण धोरणासाठी 'कार्यबल गट' स्थापन

## कुलगुरु डॉ. राजनीश कामत यांचा समिती सदस्य म्हणून समावेश : अंमलबजावणी सुनिश्चित

- शैक्षणिक, प्रशासकीय आणि तांत्रिक अडचणींच्या निराकरणार्थ समिती काम करणार

**जनप्रवास : कोल्हापूर**

एनईपी अर्थात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारकडून 'कार्यबल गट' स्थापन करण्यात आले आहे. यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्यीय समिती कार्यरत असणार आहेत. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णयानुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या राज्यातील सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये प्रभावी, सुसूत्र तसेच एकसमान अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने शुक्रवारी एक स्वतंत्र 'कार्यबल गट (टास्क फोर्स)' गठित केला आहे. दरम्यान, या समितीत कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांचा सदस्य म्हणून समावेश केला आहे.

भारत सरकारने २९ जुलै २०२० रोजी



जाहीर केलेल्या एनईपी २०२० च्या अंमलबजावणीदरम्यान राज्यातील विद्यापीठांना श्रेयांक हस्तांतरण / गुणांक हस्तांतरण, बहुप्रवेश व बहिर्गमन व्यवस्था, समांतर प्रवेश / थेट पुढील स्तरावर प्रवेश, कार्यस्थळी प्रशिक्षण / इंटर्नशिप (प्रशिक्षणार्थी कालावधी), एकसमान शैक्षणिक दिनदर्शिका आणि भारतीय ज्ञान प्रणाली अभ्यासक्रम आदी अनेक शैक्षणिक, प्रशासकीय व तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागत होते. या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच धोरणात्मक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने सदर कार्यबल गटाची स्थापना केली आहे.

### कार्यबल गटाची प्रमुख कार्यकक्षा

चार वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या चौथ्या वर्षाच्या पात्रता, प्रवेश प्रक्रिया व कार्यस्थळी प्रशिक्षण / इंटर्नशिप (प्रशिक्षणार्थी कालावधी) साठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे, राज्यभर 'एकसमान शैक्षणिक कॅलेंडर' (एकसमान शैक्षणिक दिनदर्शिका ) लागू करण्यासाठी पाठपुरावा



करणे, सर्वसाधारण भारतीय ज्ञान प्रणाली अभ्यासक्रम आणि विषयविशिष्ट भारतीय ज्ञान प्रणाली अभ्यासक्रमाबाबत निश्चित मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे, विद्यार्थ्यांच्या एका विद्यापीठातून दुसऱ्या विद्यापीठात स्थलांतरणासाठी नियमावली तयार करणे, समांतर प्रवेश, पुनःप्रवेश आणि अभ्यासक्रमातून बाहेर पडण्याची प्रक्रिया संदर्भात धोरण निश्चित करणे चार वर्षीय पदवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या पीएचडी प्रवेशाबाबत नियम ठरवणे विद्यार्थी, शिक्षक आणि संस्थाचालकांसाठी 'मदत कक्ष' यंत्रणा उभी करणे प्राध्यापकांसाठी एफडीपी (अध्यापक कौशल्य विकास कार्यक्रम ) आयोजित करण्याचे विद्यापीठांना निर्देश देणे, दर तीन महिन्यांनी प्रगती अहवाल शासनास सादर करणे अशाप्रकारचे हे कामकाज असेल.

दरम्यान, हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२६०५२९१६२३०३६००८ आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढला आहे. राज्यपालांच्या आदेशानुसार आणि नावाने सहसचिव प्रताप पां. लुबाळ यांनी हा आदेश जारी केला आहे.

### समितीतील सदस्य असे

या समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. नितीन करमळकर असणार आहेत. ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू आहेत. सदस्य म्हणून मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी, जळगावमधील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. व्ही. एल. महेश्वरी, कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांचा समावेश आहे. तर सदस्य संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे सदस्य संचालक, तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई सदस्य डॉ. अनिल राव निवृत्त प्राचार्य सदस्य, भरत अमळकर शिक्षण तज्ज्ञ सदस्य सचिव प्र-कुलगुरू मुंबई विद्यापीठ यांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAY 2026

पुढारी

# नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणी समितीवर कुलगुरू डॉ. कामत यांची नियुक्ती

कोल्हापूर : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची राज्यातील सर्व विद्यापीठे



व महाविद्यालयांमध्ये प्रभावी व एकसमान अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने नऊ सदस्यीय कार्यबल गट स्थापन केला आहे. यात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्यातील विद्यापीठांना क्रेडिट ट्रान्स्फर, मल्टीपल एंट्री-एक्झिट, लॅटरल एंट्री, युनिफॉर्म अॅकेडमिक कॅलेंडर व आयकेएस अभ्यासक्रमांबाबत विविध अडचणी येत आहेत. त्यापार्श्वभूमीवर प्रा. डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना केली आहे.

30 MAY 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधन, उद्योगाभिमुख शिक्षणासाठी संयुक्त प्रयत्न करू

## कुलगुरू डॉ. रजनीश कामत; 'केआयटी'कडून नूतन कुलगुरूंचा सत्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

उच्च शिक्षण संस्थांनी केवळ पदवी प्रदान करणाऱ्या संस्था म्हणून न राहता विद्यार्थ्यांमध्ये समस्या सोडवण्याची क्षमता, नेतृत्व गुण, संशोधन वृत्ती आणि उद्योजकीय विचार विकसित करणारे केंद्र बनले पाहिजे. विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेसाठी सक्षम बनवणे ही आजच्या शिक्षण व्यवस्थेची प्रमुख गरज आहे. उच्च शिक्षण, संशोधन आणि उद्योगाभिमुख शिक्षणासाठी सहकार्य करू, अशी ग्वाही शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी दिली. केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते.

संस्थेचे अध्यक्ष साजिद हुदली, उपाध्यक्ष सचिन मेनन, विश्वस्त भरत पाटील, सुनील कुलकर्णी यांनी कुलगुरूंचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या. कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, केआयटीसारखी दर्जेदार संस्था ज्याप्रकारे नवीन शैक्षणिक धोरणाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी उद्योग, संशोधन संस्था आणि समाज यांच्याशी अधिक सशक्त संबंध निर्माण करत आहेत, ते कौतुकास्पद आहे.

संस्थेचे संचालक डॉ. मोहन वनरोट्टी यांनी पारंपरिक शिक्षण पद्धतीत बदल करून विद्यार्थीकेंद्रित, प्रकल्पाधारित आणि अनुभवाधारित शिक्षणावर भर देण्याची गरज व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAY 2026
तरुण भारत

# राज्य कार्यबल गट समितीवर डॉ. कामत यांची नियुक्ती

प्रतिनिधी, कोल्हापूर

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग अंमलबजावणीसाठी राज्य सरकारकडून 'कार्यबल गट" स्थापन करण्यात आला आहे. डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्यीय समिती स्थापन केली आहे. या समितीवर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये प्रभावी, सुसूत्र व एकसमान अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने आज एक स्वतंत्र 'कार्यबल गट" गठित केला आहे. भारत सरकारने जाहीर केलेल्या २०२० च्या अंमलबजावणीदरम्यान राज्यातील विद्यापीठांना अनेक शैक्षणिक, प्रशासकीय व तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागत होते. या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच धोरणात्मक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने सदर कार्यबल गटाची स्थापना केली आहे. कार्यबल गटाची प्रमुख कार्यकक्षा : चार वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या चौथ्या वर्षाच्या पात्रता, प्रवेश प्रक्रिया व मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे राज्यभर 'एकसमान शैक्षणिक कॅलेंडर" लागू करण्यासाठी पाठपुरावा करणे, निश्चित मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे, विद्यार्थ्यांच्या एका विद्यापीठातून दुसऱ्या विद्यापीठात स्थलांतरणासाठी नियमावली तयार करणे, संदर्भात धोरण निश्चित करणे, चार वर्षीय पदवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत नियम ठरवणे, विद्यार्थी, शिक्षक व संस्थाचालकांसाठी 'मदत कक्ष" यंत्रणा उभी करणे, दर तीन महिन्यांनी प्रगती अहवाल शासनास सादर करणे. राज्यपालांच्या आदेशानुसार व नावाने सहसचिव प्रताप लुबाळ यांनी हा आदेश जारी केला आहे.

## अशी आहे समिती :

**अध्यक्ष प्रा. डॉ. नितीन करमळकर (माजी कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), सदस्य डॉ. रवींद्र कुलकर्णी (कुलगुरू, मुंबई विद्यापीठ), डॉ. व्ही. एल. महेश्वरी (कुलगुरू, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव), डॉ. राजनीश कामत (कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), डॉ. अनिल राव (निवृत्त प्राचार्य), भरत अमळकर (शिक्षण तज्ज्ञ).**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAY 2026
सकाळ

# 'शैक्षणिक धोरण कार्यबल गटा'च्या सदस्यपदी कुलगुरू डॉ. कामत



डॉ. आर. के. कामत

कोल्हापूर, ता. २९ : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने कार्यबल गटाची स्थापना केली आहे. त्याच्या सदस्यपदी शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांची नियुक्ती झाली.

या शैक्षणिक धोरणाची राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये प्रभावी, सुसूत्र व एकसमान अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी शासनाने एक स्वतंत्र ''कार्यबल गट'' गठित केला आहे. या गटाच्या अध्यक्षस्थानी डॉ. नितीन करमळकर असून, अन्य नऊ सदस्यांचा समावेश आहे. चार वर्षीय पदवी अभ्यासक्रमाच्या चौथ्या वर्षाच्या पात्रता, प्रवेश प्रक्रिया, ओजीटी/इंटर्नशीपसाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे. राज्यभर 'एकसमान शैक्षणिक कॅलेंडर' लागू करण्यासाठी पाठपुरावा करणे. विद्यार्थ्यांच्या एका विद्यापीठातून दुसऱ्या विद्यापीठात स्थलांतरणासाठी नियमावली तयार करणे. चार वर्षीय पदवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या पीएच.डी. प्रवेशाबाबत नियम ठरवणे. विद्यार्थी, शिक्षक व संस्थाचालकांसाठी 'मदत कक्ष' यंत्रणा उभी करणे, अशी या गटाची कार्यकक्षा आहे.